**दापोरी** : मोर्शी येथील भारतीय महाविद्यालयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासह नैतिक व सामाजिक विकासात्मक मूल्य रूजविण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची समाज जीवनाशी नाळ जोडण्याच्या हेतूने राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत महाविद्यालय स्तरावरून गावागावांत विविध कार्यक्रम घेतले जातात. याचाच एक भाग म्हणून १७ जानेवारी ते २३ जानेवारी या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर मोर्शी तालुक्यातील लाडकी बु.येथे आयोजित केले आहे.

या राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन १७ जानेवारी रोजी डॉ.रमेश बिजवे अध्यक्ष भा.म.वि.अमरावती यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी डॉ.आराधना वैद्य कोषाध्यक्ष भा.म.वि. अमरावती उपस्थित होते. भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य जी.एस. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी नविणकुमार पेठे, सुनंदा भुयार, डिगांबर बुरंगे, राहुल वडे, संदीप लव्हाळे, प्रवीण कोहळे, विजय उमेकर, एस.डी.गोबरे, राजू वानखडे, सुधाकर खैरकर, दिलीप वानखडे यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

दै देशोन्नती 20-1-18

दै वृत्तकेसरी ०६ जुलै २०१७

# भारतीय महाविद्यालयात १०० वृक्षांची लागवड

### राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे वृक्ष जगविण्याचा संकल्प

ता. प्रतिनिधी / ५ जुलै

**मोशी:** भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे राष्टीय सेवा योजना पथकातर्फे वृक्ष लागवड कार्यक्रमाचआयोजन करून शासनाने प्रदूषण व दुष्काळ निवारणाच्या उद्देशाने कृषी दिवस आणिवनमहोत्सवाचे औचित्य साधून चार कोटी वृक्ष लागवडीचेनियोजनकेले. त्या अनुषंगानेभविष्यातील सुख समृध्दीचा विचार करुन जिल्ह्यातील समस्त जनतेने तसेच महाविद्यालयातीलसर्व विद्यार्थ्यांनी सुद्धा वृक्षारोपण करुन या जनहित योजनेला प्रचंड प्रतिसाद द्यावा आणि वृक्षलागवडीनंतर संवर्धनाची जबाबदारी सर्वांनीस्विकारावी असे प्रतिपादन प्राचार्य जी एस मेश्रामयांनी केले.

भारतीय महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजना पाथकातर्फे भव्य वृक्षदिडी काढण्यात आली. भारतीय महाविद्यालयात दिडीचे समारोप होवून महाविद्यालयाच्या परिसरात प्राचार्य जी एसमेश्राम, वन परिक्षेत्र अधिकारी एस डी डगडे, श्री सुखदेवराव राऊत, नाविणकुमार पेठे, प्रीतीब्रम्हानंद देशमुख, हर्षल चौधरी, रुपेश वाळके, श्रणीत राऊत, घारड साहेब, डॉ बी एसचंदनकर, डॉ एस बी बीजवे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ संदीपराऊत, डॉशिरीषटोपरे, प्रारजनीशबांबोळे, प्रासावनदेशमुख, प्रा खांडेकर, रुपेश मेश्राम, प्रा टेंम्भूरणे, प्रा रामटेके, रोहितप्रसाद तिवारी, प्रा काळे, प्रा घनश्याम दाणे, यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वन परिक्षेत्र अधिकारी एस डी डगडे यांनी वृक्ष लागवड संदर्भात नियोजनात्मक माहितीदेतांना म्हणाले की, मोर्शीतालुक्यात २०१७यावर्षातविविधविभागांचा समावेश करुन मोठ्याप्रमाणात रोपे लावण्याचे नियोजनकरण्यात आले आहे. त्यात वनविभागाव्दारे मौजा घोडदेव येथे२७७७५ वृक्षाची लागवड करण्यात आली असून सामाजिक वनीकरण विभागामार्फत, वनविकासाहामंडळामार्फत ग्रामपंचायत व इतर यंत्रणेमार्फत वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट आहे. अशा विविधयंत्रणामार्फतीने वृक्ष लागवड करण्याचेनियोजनकेले असल्याची माहिती वन वपरिक्षेत्र अधिकारीएस डी डगडे यांनी दिली. यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, वमहाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



मोशी: वृक्षारोपणाकरिता आणलेल्या वृक्षासह प्राचार्य जी.एस. मेश्राम यांच्यासह वन अधिकारी व विद्यार्थी.

**जनमाध्यम** अमरावती, गुरुवार २८ सप्टेंबर २०१७

# रासेयो पथकाचे ग्रामस्वच्छता अभियान




**मोर्शी/ प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी संपुर्ण देशभऱ्यात ग्रामस्वच्छता अभियान राबविणे सुरु केले. या ग्रामस्वच्छता अभियानाला हातभार लागावा. या दृष्टीकोणातुन भारतीय महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाने मोर्शी शहरातील जयस्तंभ चौक, गांधी पुतळ्या समोरील खुली जागा, पोस्ट ऑफीस, तहसिल कार्यालय व एसटी आगार पुर्णतःहा झाडुन साफ केले.

या रायेसो पथकाच्या वतीने दर रविवारी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात येते. आगार व्यवस्थापक भालतिडक व शर्मा यांच्या उपस्थितीत स्वच्छता अभियानाबाबत शपथविधी पार पडला. या स्वच्छता अभियानासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप राऊत, प्रा. विनायक खांडेकर, प्रा. शिरीष टोपरे, रुपेश मेश्राम, मनोज वाहाने, पत्रकार विकास पाटिल, अजय पाटील, राहुल हगवने रासेयो पथकाचे विद्यार्थ्यांनी अथक परीश्रम घेतले.

देशोन्नती शनिवार, दि. १५ डिसेंबर २०१८

दै. देशोन्नती 15 डिसे. 2018

# लाडकी येथे 'उन्नत भारत' अभियानाचा शुभारंभ

वार्ताहर / १४ डिसेंबर

दापोरी : मोर्शी येथिल भारतीय महाविद्यालय व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दत्तक ग्राम लाडकी बु. येथे उन्नत भारत अभियान अंतर्गत उदघाटन समारंभ पार पडला.



अभियान शुभारंभ प्रसंगी उपस्थित मान्यवर

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रमेश बिजवे, अध्यक्ष, भारतीय विद्यामंदिर अमरावती, उद्घाटक म्हणून डॉ. डी.टी. इंगोले, संचालक, नवोपक्रम, नवसंशोधक, सहचर्य विभाग, सं.गा. बा. अ. वि.अमरावती, तर प्रमुख अतिथी व मागदर्शक डॉ.अर्चना बारब्दे, प्रवर्तक, उन्नत भारत अभियान, भारत, प्रमुख अतिथी म्हणून डॉ. प्रशांत शिगवेकर, डॉ. राजेश बुरंगे, भारतीय विद्यामंदिर अमरावतीचे उपाध्यक्ष अनंत सोमवंशी, सरचिटणीस डॉ. सतीश कुळकर्णी, सचिव सलील चिंचमलातपुरे, सदस्य ॲड. यदुराज मेटकर, माजी प्राचार्य जी. एस. मेश्राम, गावच्या सरपंचा सौ.सुनंदाताई भुयार, उपसरपंच डॉ. दिगंबर बुरंगे, सदस्य राजाभाऊ वानखडे, सौ. किरण बरडे, पोलिस पाटील राहुल वडे, ॲड. सुनील वानखडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे, राजाभाऊ पिदडी, कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप राऊत, कार्यक्रम अधिकारी डॉ. जे. एल. रामटेके, महाविद्यालयातील प्राध्यापक, गावकरी, विद्यार्थी बहुसंख्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. रामेश बिजवे यांनी मार्गदर्शन करताना शिक्षित भारत - स्वस्थ भारत- स्वच्छ भारत - स्वावलंबी भारत- संपन्न भारत या संकल्पनेतून साकार झालेली व राष्ट्रीय ग्रामीण विकासाच्या हेतूने राबविल्या जाणाऱ्या 'उन्नत भारत अभियान' या उपक्रमात विद्यापीठांतर्गत भारतीय महाविद्यालय मोर्शीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दत्तक घेतलेल्या लाडकी बु. ची निवड होणे ही भारतीय विद्यामंदिर संस्थेसाठी गौरवाची बाब आहे, असे सांगितले.

उद्घाटन पर भाषणात डॉ.डी. टी. इंगोले यांनी या अभियाना अंतर्गत पुढील तीन वर्षात लाडकी बु. गावाचा स्वच्छता, शिक्षण, आरोग्य, रोजगार, कौशल्य विकास, स्वावलंबन, पाणी समस्यावर मात करून गावाचा सर्वांगीण विकास करावा, ही अपेक्षा व्यक्त केली, तर प्रमुख अतिथी तसेच मार्गदर्शक डॉ. अर्चना बारब्दे यांनी उन्नत भारत अभियान अंतर्गत सुंदर व परिपूर्ण गावाची निर्मिती करणे शक्य असल्याचे सांगून विविध योजनांची माहिती दिली.

याप्रसंगी डॉ. प्रशांत शिगवेकर, डॉ.राजेश बुरंगे, राजाभाऊ पिदडी यांनी विचार व्यक्त केले. तसेच गावकरी डॉ. दिगंबर बुरंगे, दिलीप वानखडे, हरिष निशाण यांनी गावातील विविध समस्यांची मांडणी केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे यांनी, तर सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी डॉ. संदीप राऊत यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ जे.एल. रामटेके यांनी केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व गावकरी मंडळीनी अथक परिश्रम घेतले.

ज्ञानज्योती भन्तेजी संघ

# भारतीय महाविद्यालयाचे रासेयो श्रमसंस्कार शिबीर

## लाडकी बु. येथे आयोजन



प्रतिनिधी / २२ जानेवारी

मोर्शी : येथील भारतीय महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर तालुक्यातील लाडकी बू. येथे नूकतेच उतसाहात संपन्न झाले. या शिबीरात विविध प्रबोधनात्मक उपक्रमांसोबतच कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रमसंस्कारातून रासेयो स्वयंसेवकांनी गावात काही सार्वजनिक उपयोगाची कामेही पार पाडलीत.

या शिबीराचे उद्घाटन स्थानिक विकास समिति सदस्य सुखदेव राऊत यांच्या हस्ते झाले. अध्याक्षस्थानी प्राचार्य डॉ. एंस. बी. बिजवे हे होते. यावेळी डॉ. बी. एस. चंदनकर, नविनकुमार पेठे, सरपंच सौ. सुनंदा भुयार, उपसरपंच डॉ. बरंगे, राजु वानखडे, राबिया बी. शहा, सौ. बरडे उपस्थित होते. डॉ. चंदनकर यांनी आपल्या मार्गदर्शनातुन विद्यार्थीनी सज्ज व जागृत राहुन जीवन जगत असतांना परोपकार करणारी पिढी रासेयोच्या माध्यमातून घडू शकते, असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. संदीप राऊत तर संचालन डॉ. जयमाला रामटेके यांनी केले. तर डॉ. सावन देशमुख यांनी आभार मानले. कार्यक्रमाला डॉ. बांबोळे, डॉ. टोपरे, डॉ. साबळे, डॉ. टेंभूर्णे मॅडम, प्रा. खांडेकर, प्रा. काळे, प्रा. पाझरे, राहुल वडे, डॉ. संदीप राऊत, प्रविण कोहळे, जीवन ढोके, हरीश निशान, मंगेश टाकोडे, दिलीप वानखडे उपस्थित होते. शिबीराच्या यशस्वितेसाठी प्रा. घनशाम दाणे, डॉ. भैयासाहेब चिखले, प्रा. मनोज वाहने, अमरदीप अमझरे, कु. स्वामिनी वरघट आदिंचे सहकार्य लाभले.

मातृभूमी 23 जाने. 2019

# 7.1.1 : Institutional Values and Social Responsibilities

**तरुण भारत**

गुरुवार, १९ डिसेंबर २०१९

दै. तरुण भारत 20.12.19

## रासयो स्वयंसेवकांनी चार तासांत बांधला वनराई बंधारा

◆ **मोर्शी १८ डिसेंबर**

महाविद्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या येरला गावातून येणारा आणि दमयंती नदीला जाऊन मिळणाऱ्या नाल्यावर राष्ट्रीय सेवा योजनेच्या ९७ स्वयंसेवेकानी केवळ चार तासांत बांध घालून वनराई बंधारा बांधला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक दरवर्षी निरनिराळे समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात. तसेच एकजुटीने कोणतीही गोष्ट सहज साध्य करता येते, ही भावना आजच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवता आली पाहिजे, याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध कार्यक्रम राबविण्यात येत असतात. या विविध अंगी कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये समाजात आपले स्थान, आपले कर्तव्य, बंधुभाव, सामंजस्य या भावना निर्माण होऊन त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत मिळते. हा वनराई बंधारा बांधण्याचा उद्देश म्हणजे गावातून आणि मोर्शी शहराच्या काही भागातील सांडपाणी या नाल्याद्वारे दमयंती नदीला जाऊन मिळते. या सांडपाण्याचा काही तरी उपयोग व्हावा, म्हणून रासेयोच्या स्वयंसेवकानी श्रमदान करून चार तासांत ३० फूट लांब आणि ४ फूट उंच बंधारा बांधला, जेणे करून वाहून जाणारे पाणी थांबवून त्या द्वारे भूमिगत पाण्याची पातळी वाढविल्या जाऊन त्याचा उपयोग सिंचनासाठी करता येऊ शकतो. या बंधाऱ्याच्या बांधणीकरिता अमरावती, मोर्शी या वन्यजीव व पर्यावरण प्रेमी संघटनेने स्वयंसेवेकाना सहकार्य केले, तर मोर्शी शहरातील प्रतिष्ठित नागरिक सुमित अग्रवाल यांनी सिमेंटचे २५० पोते देऊन हातभार लावला. यासीन सौदागर यांनी बांधातील पाणी फार काळ टिकून राहावे याकरिता मोठी ताडपत्री दान दिली. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सावन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकानी ही मोहीम पार पाडली.



बंधारा उभारणीचे काम करताना रासयोचे स्वयंसेवक.

हा बंधारा ३० फुट लांब असून पुढील काळात त्याला ४० फूट लांब आणि ६ फूट उंच करण्यात येईल, अशी माहिती डॉ. सावन देशमुख यांनी दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे यांनीही विचार मांडले. तसेच कार्स मोर्शीचे अक्षय लुंगे, प्रणव भगत, प्रज्वल निकम, सुमित राऊत, पवन घोरमाडे यांनी स्वयंसेवकांना सहकार्य केले तर राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकातील प्रतिक वाहिले, प्रणव भगत, हरीश तळोकार, अमदीप अमझरे, कमलेश उइकि, केतन झाडे, निकेश निमजे, राहुल मानकर, इरफान शेख, साहिल कान्हेरकर, अंकुश गंगाये, विशाल सोनुले आदींनी व इतर स्वयंसेवकांनी श्रमदान केले. स्वयंसेवकांच्या या कार्याचे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. सुरेश बिजवे, प्रा. डॉ. सावन देशमुख, कार्यक्रम अधिकारी, डॉ. लाजवंती टेंभूर्णे प्रा. विनायक खांडेकर, प्रा. डॉ. रजनीश बांबोळे आदींनी कौतुक केले आणि पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. ◂(*तभा वृत्तसेवा*)

---

**देशोन्नती**

सोमवार, दि. १३ सप्टेंबर २०२१

दै. देशोन्नती 13 sep 21

## भारतीय महाविद्यालय मोर्शीच्या अभिनव उपक्रमाला सदिच्छा भेट

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मोर्शी** ■ भारतीय महाविद्यालय मोर्शी येथील राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारे पर्यावरणपूरक गणपती निर्माण उपक्रमाला डॉ. राजेश बुरंगे संचालक, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती डॉ. ओमप्रकाश मुंदे, सिनेट सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी सदिच्छा भेट दिली.



या सदिच्छा भेटीदरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. सावन देशमुख, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. एल.आर. टेंभुर्णे, डॉ. रजनीश बांबोळे, डॉ. शिरीष टोपरे, प्रा. विनायक खांडेकर, प्रा. दीपक काळे, डॉ. भगवान साबळे, प्रा. अरविंद पाझारे, प्रा. गोपाल भलावी, प्रा. विनायक देशपांडे, प्रा. मनोज वहाने, राज धोटे, भरतसिंग तसेच रासेयोचे स्वयंसेवक प्रीतम कोंधे, इरफान शेख, प्रतीक वाहिले, राहुल मानकर, साहिल कान्हेरकर, प्रतीक आखरे, तेजस हिवे, भूषण खडसे, निखील नरसिंगकर, आवेज शेख, धनश्री रोडे, रिद्धी बच्छ, रोशनी तट्टे, श्रद्धा एकोटखाने, पल्लवी ठाकरे, पूनम टोहने, कोमल गजबे, आचल लुंगे, निशा कुकडे, राखी बडासे, मयुरी चौधरी यांनी परिश्रम घेतले.

# 7.1.1 : Institutional Values and Social Responsibilities

भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे राष्ट्रीय सेवा

## योजना दिवस आणि स्वातंत्र्यांचा सुवर्ण महोत्सव साजरा

दै. मातृभूमी 29.09.21






ता.प्रतिनिधी/२८ सप्टेंबर

**मोर्शी**-स्थानिक भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग मार्फत्त राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस आणि स्वतंत्राचा सुवर्ण महोत्सव याचे औचित्य साधून स्वच्छता मोहीम व वृक्षारोपण कार्यक्रम साजरा करण्यात आला.दरवर्षी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस 24 सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. तसेच हे वर्ष स्वतंत्राचा सुवर्ण महोत्सव म्हनून साजरा करण्यात येत आहे. याचेच औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे स्वच्छता अभियान आणि वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला.कार्याक्रमच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश बिजवे होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि क्रांतयोगी गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. कार्यक्रमच्या वेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सावन देशमुख, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. लाजवंती टेंम्भूर्णे तसेच महाविद्यालायचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ. रजनीश बांबोळे, डॉ. शिरीष टोपरे, प्रा. विनायक खांडेकर, प्रा. दीपक काळे, डॉ. संदीप राऊत, डॉ. भगवान साबळे, प्रा. अरविंद पाझारे प्रा. गोपाल भलावी, डॉ. दिपाली देशमुख, प्रा. घनश्याम दाने, प्रा. भैय्यासाहेब चिखले, कु. भाग्यश्री राठोड, प्रा. दीलीप गुलवाडे, प्रा. विनायक देशपांडे, प्रा. साकेत चिंचमलातपुरे, प्रा. श्रावण पवार, प्रा. राजेश भागवतकर, प्रा. रामदास इंगळे, प्रा. संजय, गिरीधर पुरोहित, रुपेश मेश्राम आणि इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सावन देशमुख रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी केले. यावेळी ते म्हणाले की संपूर्ण देश आज स्वातंत्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करत आहे तसेच विद्यार्थ्यांना समाजाप्रती आपली जवाबदारी ओळखणे गरजेचे आहे. आणि हीच जबादारी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना एक उत्कृष्ट नागरिक बनविण्याचा प्रयत्न करीत असते. म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेचा स्थापना दिवस साजरा करण्यात येतो. यावेळी या कार्यक्रमाची सुरुवात वृक्ष रोपणाचे आणि स्वच्छता अभियान राबवून करण्यात आली. सदर वृक्षरोपण कार्यक्रमा करिता सामाजिक वनीकरनाचे सहाय्यक वनसंरक्षक श्री. नितीन गोंडाणे सर यांनी महाविद्यालयास झाडे उपलब्ध करून दिली. तसेच अमरावती प्रादेशिक वन विभागाच्या सहाय्यक वनसंरक्षक लीना आडे मॅडम, मोर्शी वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी शीतल घोटे मॅडम यांनी मोलाचे सहकार्य केले. सदर कार्यक्रमाकरिता राष्ट्रीय सेवा योजनचे अक्षय लुंगे, प्रीतम पडोळे, इरफान शेख, प्रीतम कोंधे, प्रतिक वाहिले, साहिल कान्हेरकर, राहुल मानकर, प्रतिक आखरे, प्रफुल चिखले, तेजस हिवे, भूषण खडसे, निखील नरसिंगकर, धनश्री रोडे, रिद्धी बच्छ, रोशनी तट्टे, गौरी देशपांडे, पल्लवी ठाकरे, पूनम टोहने, आचल लुंगे, श्रद्धा एकोतखाने, कोमल गजबे, आचल लुंगे, निशा कुकडे, मयुरी चौधरी, किशोरी निकम, शुभांगी माहोरे, श्रुतिका इखार यांनी परिश्रम घेतले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे 210 स्वयंसेवक उपस्थित होते.

## जागतिक महिला दिनी विकार परवीन सईद पटेल यांची पोलीस उप निरीक्षक पदी नियुक्ती



अमरावती दि. १२ : पोलीस उप निरीक्षक परीक्षेत विकारपरवीन सईदखान पटेल यांची निवड झाली आहे, विकार हि मूळ ची अंबाडा ता मोर्शी या गावाची रहिवाशी असून ती अतिशय साधारण परिस्थिती मधील मुलगी आहे तीच प्राथमिक शिक्षण ग्रामविकास विद्यालय अंबाडा येथे झाले असून पदवी भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे झाले आहे, ती लहानपणा पासून हुशार व महत्व कांशी विद्याथीनी आहे , तिची तल्लख बुद्धी बघून कांदळकर सर यांनी तिला प्रशासकीय सेवे कडे .वडविले तिचा आई वडिलांची इचछा ती प्रशासकीय सेवेत रुजू .व्हावी हि होती, त्या स्वप्ना ला पूर्ण करण्यासाठी तिने अहोरात्र मेहनत घेतली.

विकार परवीन यांची शारीरिक चाचणी सुरु असताना वडिलांचे निधन झाल्याने त्यांचा वर दुःख डोंगर कोसडला होता तरी सर्व दुःख विसरून परिस्तितीवर मत करीत शारीरिक चाचणी परीक्षेत यश प्राप्त केले, तिचा या यशा मागे ती तिचा आई वडिलांना श्रेय देते. दै. हिंदुस्थान 13 मार्च 19

# 7.1.1 : Institutional Values and Social Responsibilities

दै. विदर्भ मतदार 06 मार्च 2018

## भारतीय महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र



**मोर्शी (तालुका प्रतिनिधी) :** भारतीय विद्यामंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी व आधार सोशियल रिसर्च ण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इंस्टिट्यूट, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात इंग्रजी, वाणिज्य व अर्थशास्त्र विषयाचें एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात पार पडले. .

यावेळी अध्यक्षस्थानी प्रा. रामराव बिजवे, उद्घाटक डॉ.एस.व्ही. कुळकर्णी, प्रमुख अतिथी डॉ. आराधना वैद्य व प्रा. मोहम्मद फारुकउल्लाह, प्रा. विराग गावंडे यांची उपस्थिती होती.यावेळी प्रा. रामराव बिजवे यांनी सदर चर्चासत्राच्या निमित्ताने होणारे विचारमंथन प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार असल्याचा आशावाद व्यक्त केला. या निमित्ताने इंग्रजी विषयाचे बीजभाषक डॉ. प्रतीक बॅनर्जी, नागपूर व वाणिज्य विषयाचे बीजभाषक डॉ. दिनेश निशीत आणि अर्थशास्त्र विषयाचे बीजभाषक डॉ. श्रीनिवास खांदेवाले यांनी संबधित विषयासंदर्भात मार्मिक चिंतन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.प्रास्ताविक प्राचार्य जी.एस. मेश्राम यांनी केले. इंग्रजी विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजक सचिव डॉ. एस.बी. बिजवे, वाणिज्य विषयाच्या डॉ. जे.एल. रामटेके व अर्थशास्त्र विषयाच्या डॉ. एल.आर.टेंभूर्णे यांनी प्रस्तुत चर्चासत्राचे यशस्वी आयोजन केले. सदर चर्चासत्राप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेचे प्रकाशन झाले. संचालन डॉ. स्नेहा जोशी तर आभार डॉ. दिपाली देशमुख यांनी मानले. समन्वयक प्रा. व्हि.व्हि, खांडेकर, व प्रा. डी.एन. काळे यांनी मोलाची भूमिका पार पाडली.चर्चासत्रास प्राचार्य डॉ. आर.ए. उमेकर, डॉ. गेडाम, विविध महाविद्यालयातील तज्ज्ञ मार्गदर्शक, विचारवंत संशोधक प्राध्यापक, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

शिवाजी महाराज यांची ... या येथून प्रारंभ झालेल्या शोभायात्रेचा

दै. देशोन्नती 06/03/2018

## भारतीय महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्र

*तालुका प्रतिनिधी* / ५ मार्च

**मोर्शी** : भारतीय विद्यामंदिर अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी व आधार सोशियल रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इन्सिट्यूट अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच महाविद्यालयात इंग्रजी, वाणिज्य व अर्थशास्त्र विषयाचे एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र पार पडले.

सदर चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभास अध्यक्ष म्हणून प्रा.रामराव बिजवे (माजी सरचिटणीस तथा सदस्य, भारतीय विद्यामंदिर अमरावती) हे उपस्थित होते. आपल्या मनोगतात त्यांनी सदर चर्चासत्राच्या निमित्ताने होणारे विचारमंथन प्राध्यापक व विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणार असल्याचा आशावाद व्यक्त केला, तर उद्घाटक म्हणून डॉ.एस.व्ही. कुळकर्णी व प्रमुख अतिथी म्हणून डॉ.आराधना वैद्य व प्रा.मोहम्मद फारूकउल्लाह, प्रा.विराग गावंडे उपस्थित होते.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने इंग्रजी विषयाचे बिजभाषक डॉ.प्रतिक बॅनर्जी, नागपूर व वाणिज्य विषयाचे बिजभाषक डॉ.दिनेश निशीत आणि अर्थशास्त्र विषयाचे बीजभाषक डॉ.श्रीनिवास खांदेवाले यांनी संबंधित विषयासंदर्भात मौलिक व मार्मिक चिंतन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

संचालन कु.स्नेहा जोशी, तर आभार डॉ.दिपाली देशमुख यांनी मानले. वाणिज्य विषयाचे समन्वयक प्रा.व्ही.व्ही.खांडेकर व प्रा.डी.एन. काळे यांनी मोलाची भूमिका पार पाडली.

चर्चासत्रास प्राचार्य डॉ.आर.ए. उमेकर, डॉ.गेंडाम, विविध महाविद्यालयातील तज्ज्ञ मार्गदर्शक, विचारवंत संशोधक, प्राध्यापक, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोर्शीत मराठी व भूगोल विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र

- भारतीय महाविद्यालयात आयोजन
- अनेक मान्यवरांची राहिली उपस्थिती



प्रतिनिधी / ६ मार्च

**मोर्शी** : अमरावतीच्या भारतीय विद्यामंदिराद्वारा संचालित मोर्शी येथील भारतीय महाविद्यालय व आधार सोशियल रिसर्च अँड डेव्हलपमेंट ट्रेनिंग इंस्टिट्युट अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय महाविद्यालयात नुकतेच भूगोल आणि मराठी या विषयावर एक दिवसांच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी भारतीय विद्यामंदिराचे अध्यक्ष अनंत सोमवंशी हे होते. डॉ. एस. व्ही. कुळकर्णी यांच्या हस्ते या चर्चासत्राचे उद्घाटन झाले. या चर्चासत्रात मराठी विषयाचे बीजभाषण डॉ. प्रकाश राठोड यांनी केले. 'मराठी साहित्य : चर्चा आणि चिंतन' या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले. साहित्य हा समाजाचा आरसा असून मानवी भाव-भावना, लोकजीवन, समाजजीवन, संस्कृतीचे अंतरंग म्हणजे साहित्य होय, असे ते म्हणाले. त्यांनी मराठी साहित्याची सैद्धांतिक मांडणी केली. भूगोल विषयाचे बीजभाषण डॉ. सुनील आखरे यांनी केले. 'रिसेंट ट्रेंड्स इन जिओग्राफी फॉर वाईल्डलाईफ अँड एनवायरलमेंट कॉन्झरवेशन' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असलेले डॉ. देशमुख मॅडम, चित्तरंजन दवे, अजिंक्य भटकर आदी मान्यवरांचीही यावेळी भाषणे झालीत. डॉ. सावन देशमुख यांनी भूगोल विषयाचे तर डॉ. बी. जे. साबळे यांनी मराठी विषयाचे समन्वयक म्हणून मोलाचे कार्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य जी. एस. मेश्राम यांनी केले. चर्चासत्राच्या निमित्ताने विचारवंत संशोधकांकडून विचार मंथन व्हावे व त्याचा लाभ प्राध्यापक व विद्यार्थ्यांना व्हावा या हेतूने राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्राचार्य मेश्राम यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते 'शोधवार्ता' या आंतरराष्ट्रीय जर्नलचे प्रकाशन करण्यात आले. यामध्ये विविध विद्यापीठ व महाविद्यालयांतील मान्यवर संशोधक प्राध्यापकांचे लेखांचा समावेश आहे. उद्घाटन समारंभाचे संचालन डॉ. दीपाली देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. भगवान साबळे यांनी केले.

मराठी विषयाच्या दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. विजय जाधव हे होते. या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अलका गायकवाड, डॉ. राजेश मिरगे, डॉ. वर्षा चिखले, डॉ. प्रियदर्शनी देशमुख, डॉ. विवेक देशमुख यांनी मराठी साहित्य, चर्चा आणि चिंतन या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. विनायक देशपांडे यांनी तर प्रास्ताविक डॉ. भगवान साबळे यांनी केले. प्रा. घनश्याम दाने यांनी आभार मानलेत.

दै. मातृभूमि, दि. ७ मार्च २०१५

# भारतीय महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा

*तालुका प्रतिनिधी* / ४ मे

**मोर्शी** : पदवी संपादन करणे हे जीवनाचे सर्वोच्च ध्येय नसून महाविद्यालयीन शिक्षणाची ती एक पायरी आहे. पदवीप्राप्त म्हणून आपणाकडे समाजाची पाहण्याची भूमिका आणि दृष्टी ही वेगळी राहिल, आपणाकडून मोठ्या अपेक्षा सुध्दा केल्या जातील. या अपेक्षांना तडा जाणार नाही, याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवावे, असे आवाहन स्थानिक भारतीय महाविद्यालयाचे प्राचार्य जी.एस.मेश्राम यांनी महाविद्यालयातर्फे आयोजित पदवी वितरण समारंभाप्रसंगी केले.



पदवीदान समारंभात विचार मांडताना प्राचार्य मेश्राम व उपस्थित मान्यवर

पदवी वितरण कार्यक्रमास महाविद्यालय विकास समितीचे सदस्य तथा महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी नविनकुमार पेठे, सहायक प्राध्यापक विनायक खांडेकर, शारीरिक शिक्षण संचालक डॉ.शिरीष टोपरे मंचकावर उपस्थित होते.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे या वर्षांपासून पदवीप्राप्त महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना विद्यापीठात बोलावून पदवीदान समारंभात पदवी प्रदान करण्याच्या शिरस्त्याला फाटा देवून संबंधित विद्यार्थी ज्या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेत, त्या महाविद्यालयामार्फत पदवी वितरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महाविद्यालयीन पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान व्हावा आणि इतर विद्यार्थ्यांना त्यातून प्रेरणा मिळावी म्हणून महाविद्यालयाने पदवी वितरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या प्रसंगी महाविद्यालयाच्या एकूण ११७ पदवीधरांपैकी बरेच विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

याप्रसंगी नविनकुमार पेठे, प्रा.विनायक खांडेकर, डॉ.टोपरे यांनी आपले समयोचित विचार मांडले. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा.खांडेकर यांनी सादर केली. संचालन आणि आभार प्रदर्शन डॉ.भगवान साबळे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

दै. [illegible] ५ मे. १८

मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२० हिंदुस्थान

# मोर्शी येथे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' संपन्न

**मोर्शी (वार्ताहर):** भारतीय विद्यामंदिर अमरावती द्वारा सं[illegible] रतीय महाविद्यालय, म[illegible] मराठी विभागअंतर्गत दि. [illegible] १५ जानेवारी या क[illegible] मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त मंगळवार, दि. ९ जानेवारी रोजी 'मराठी भाषेचा विकास' या विषयावर निबंध स्पर्धेचे तसेच 'मराठी शुध्दलेखन कार्यशाळा' व 'सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासंदर्भात जागृती होऊन मराठी भाषेचा विकास साधावा या हेतूने आयोजित या उपक्रमांच्या आयोजनाकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यांनी मराठी विभागास शुभेच्छा दिल्यात. तर या उपक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन त्यांच्यामध्ये मराठी भाषेची महती रूजावी याकरिता मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. भगवान साबळे व प्रा. अश्विनी काळमेघ यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

सदर उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमानिमित्त स्पर्धेमध्ये प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना पुस्तक व प्रमाणपत्र तर सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

शनिवार, ८ फेब्रुवारी २०२० विदर्भ मतदार

# विदर्भ अर्थशास्त्र परिषदेत प्रा.डॉ.नरेश इंगळे यांचा सत्कार

**अमरावती ( प्रतिनिधी ) :** मोर्शी येथील भारतीय महाविद्यालयात आयोजित दोन दिवसीय विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या समारोपीय कार्यक्रमात प्रा.डॉ.नरेश शंकरराव इंगळे यांचा स्मृतीचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ. निवृत्ती पिस्तुलकर यांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची अर्थशास्त्र विषयात आचार्य (पी. एच.डी.) पदवी प्राप्ती आणि यूजीसी निर्देशित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाद्वारा आयोजित राज्यस्तरीय पात्रता (सेट)परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल प्रा.डॉ.नरेश शं. इंगळे यांचा हा सत्कार करण्यात आला.



प्रा. डॉ. नरेश इंगळे सन्मान स्विकारताना व उपस्थित मान्यवर.

भारतीय महाविद्यालय,मोर्शी येथे हा भरगच्च कार्यक्रम झाला आहे.अध्यक्षस्थानी डॉ.मृणालिनी फडणवीस (कुलगुरू-अहिल्याबाई होळकर विद्यापीठ सोलापूर) तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रख्यात अर्थतज्ज्ञ डॉ.श्रीनिवास खांदेवाले,डॉ. आर. वाय. माहोरे, डॉ.दि.व्य. जहागीरदार, डॉ.मुक्ता जहागीरदार, प्राचार्य, डॉ.सुरेश बिजवे , संगाबा अमरावती विद्यापीठ अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ.संतोष कुटे, विदर्भ अर्थशास्त्र परिषद उपाध्यक्ष प्रा.डॉ.राजेश बुरंगे, नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा.डॉ.विनोद गावंडे, उपाध्यक्ष प्रा.डॉ.प्राची पांडे, प्रा.डॉ.दिपक शृंगारे, डॉ.संदीप म.राऊत आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते. सूत्रसंचालन परिषद सचिव प्रा.डॉ.विठ्ठल घिनमिने, व प्रा.डॉ. राजेश चव्हाण तर उपस्थिताचे आभार स्थानिक सचिव डॉ. लाजवंती टेंभुरणें यांनी मानलेत. कार्यक्रमाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली,या तिन्ही विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयाचे प्राध्यापक,संशोधक विद्यार्थी बहुसंख्येने आवर्जून उपस्थित होते.

# 7.1.1 : Institutional Values and Social Responsibilities

**मातृभूमि**

७ रविवार, दि. १२ जानेवारी २०२०

# स्मार्ट फोन आणखी स्मार्ट होतो आणि आपण मूर्ख

■ कविता फडतरे यांचे प्रतिपादन




**प्रतिनिधी / ११ जानेवारी**

**मोर्शी** - भारतीय विद्यामंदिर अमरावती व्दारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे महिला तक्रार निवारण केंद्र व प्लेसमेंट सेल अंतर्गत सावित्रीबाई फुले जयंती निमित्य महिला विषयीचे कायदे व करीअर विषयक जनजागृती या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.आर.जी.बांबोळे होते. तर उद्घाटन कविता फडतरे याच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणुन मोर्शी येथिल प्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्यां ॲड. मंजुषा खांडेकर उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी अपायकारक बाबींच्या संदर्भात सतत जागरूकता बाळगुन सतर्क राहावे असे विचार डॉ.आर.जी.बांबोळे यांनी व्यक्त केले. मोर्शी पोलिस स्टेशनच्या डी.वाय.एस.पी. कविता फडतरे यांनी विचार मांडताना म्हटले की, स्मार्टफोनचा वाढलेला वापर त्यातील वेगवेगळे आकर्षित करणारे ॲप्स या विषयीची असलेली उत्सुकता व त्यापोटी होणारे गुन्हे, नवनविन माहितीमुळे स्मार्टफोन अधिक स्मार्ट होतो व आपण मुर्ख असे विचार व्यक्त केले.सोबतच महाविद्यालयात लावलेल्या पोलिस स्टेशन तक्रार पेटीबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक करून भविष्यात असलेल्या करिअर संधी विषयी उद्‌बोधन करण्यात आले.तर प्रमुख मार्गदर्शक ॲड. मंजुषा खांडेकर यांनी स्त्रियांबाबत असलेले कायदे, त्यांचे सदुपयोग व दुरउपयोग कशाप्रकारे केल्या जाते. व कोणत्या कायद्याबाबत आपण जागरूक असले पाहिजे हे आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले. सदर कार्यक्रम प्रा. सुरेश बिजवे यांच्या मार्गदर्शनात पार पडला. सुत्रसंचालन ममता यावनाते तर प्रास्ताविक वूमेन्स ग्रिव्हन्स सेलच्या डॉ. लाजवंती टेंभुणें यांनी केले. आभार प्लेसमेंट सेलचे समन्वयक तथा ग्रंथपाल प्रा. अरविंद पाझारे यांनी मानले. कार्यक्रमाला खांडेकर, प्रा. काळे, डॉ. सावन देशमुख, डॉ. साबळे, भालावी पांडे, चिखले, पाटील प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

---

**नवराष्ट्र** 12 जानेवारी 2020

# स्मार्ट फोन स्मार्ट होतो आणि आपण मूर्ख

## डीवायएसपी कविता फडतरे यांचे प्रतिपादन




**मोर्शी.** येथील भारतीय महाविद्यालयात महिला तक्रार निवारण केंद्र व प्लेसमेंट सेल अंतर्गत महिलांविषयीचे कायदे व करिअर विषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून डीवायएसपी कविता फडतरे यांनी उपस्थित राहून स्मार्ट फोन आणखी स्मार्ट होतो व आपण मुर्ख असे मार्गदर्शनपर भाषणातून सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आर. जी. बांबोळे होते. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या ॲड. मंजूषा खांडेकर होत्या. स्त्रीयांबाबत असलेले कायदे, त्याचे सदुपयोग व दुरुपयोग याबाबत मान्यवरांनी सविस्तर मार्गर्शन केले. संचालन ममता युवनाते, प्रास्ताविक डॉ. लाजवंती टेंभूर्णे तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्रा. अरविंद पाझारे यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा. खांडेकर, प्रा. काळे, प्रा. डॉ. सावन देशमुख, डॉ. साबळे, प्रा. भलावी, प्रा. पांडे, प्रा. चिखले यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## 7.1.1 : Institutional Values and Social Responsibilities

देशोन्नती

अमरावती, बुधवार, दि. १० ऑगस्ट २०२२

# सापाला दूध पाजणे म्हणजे त्याला मृत्युच्या जवळ नेणे - डॉ. सावन देशमुख

देशोन्नती वृत्तसंकलन...



**मोर्शी** श्रद्धा अंधश्रद्धेच्या माध्यमातून सापाला दूध पाजणे म्हणजे त्याला मृत्यूच्या जवळ नेणे आहे, असे प्रतिपादन डॉ.सावन देशमुख यांनी केले.

स्थानिक भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे नागपंचमी चे औचित्य साधून -. ए. ए , सांस्कृतिक विभाग व भूगोल शास्त्र विभागाच्या संयुक्त विद्य ने साप श्रध्दा अंधश्रध्दा या विषयावर व्याखानाचे आयोजन करण्यात आले होते . व्याख्याते म्हणून डॉ सावन देशमुख यांनी सांपा चे विविध प्रकार त्यांच्या प्रमुख जाती , विषारी व बिनविषारी साप कोणते याविषयीचे सविस्तर ज्ञान ज्ू च्या माध्यमातून विद्यार्थांना दिले तसेच सापांविषयी आसणाऱ्या अनेक श्रध्दा व अंधश्रद्धा याविषयी मार्गदर्शन करून कोणताही साप चावल्यास करावयाचे उपचार' तसेच सापांना वाचविणे कसे गरजेचे आहे याविषयीचे सविस्तर माहिती दिली कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ रजनीश बांबोळे यांनी अध्यक्षीय भाषणातून सापांविषयीची भिती तसे च तो शेतक -यां चा कसा मित्र आहे हे सांगितले सुत्र संचालन व प्रास्ताविक डॉ.लाजवंती टेंभुरणे यांनी तर आभार डॉ संदीप राऊत यांनी मानले कार्यक्रमाला प्रा . काळे', ग्रथपाल अरविंद पाझारे प्रा. भलावी तसेच विद्यार्थी 'शिक्षक वर्ग व महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

देशोन्नती 10.8.22